(इंग्रजी भाषेतील न्यायनिर्णयाचा मराठी भाषेत अनुवाद)

**[१९९६]) ३ एस. सी. आर. ७६७**

**करनाल इम्प्रुव्हमेंट ट्रस्ट**
- विरुद्ध –
**राम प्रकाश आणि आणि इतर**

**२१ मार्च, १९९६**

**[ के. रामास्वामी आणि जी. टी.नानावटी, न्या. न्या.]**

भूमि संपादन कायदा, १८९४:

भरपाईचे निर्धारण - निर्धारण करणे प्रलंबित असताना, देय रकमेच्या वसुलीसाठी उत्तरवादीद्वारा अंमलबजावणी अर्ज दाखल - जमा केलेली रक्कम उत्तरवादीला जी काही रक्कम देय होती त्या रकमेपेक्षा अधिक होती हि वस्तुस्थिती लक्षात घेता, अंमलबजावणीसाठी केलेला अर्ज खारीज करण्यात यावा असा आक्षेप अपीलकर्ता ट्रस्टने घेतला - घेण्यात आलेला आक्षेप फेटाळण्यात आला - उच्च न्यायालयाने कायम केला - अपील - या आधी निर्णय देण्यात आला - अध्यक्षांनी निवाडा इतर सदस्यांच्या सहभागाशिवाय दिला या कारणास्तव सर्वोच्च न्यायालयाने न्यायाधिकरणाने दिलेला निवाडा रद्द केला आहे - या प्रकरणात निवाडा हा अस्तित्वहीन असल्याने, नवीन निवाडा जो पर्यंत देण्यात येणार नाही तोपर्यंत उत्तरवादी हुकूमनाम्याची अंमलबजावणी करू शकत नाही - उत्तरवादीला आधीच प्रदान केलेली रक्कम नवीन निवाड्याच्या निकालाच्या अधीन असेल.

करनाल इम्प्रुव्हमेंट ट्रस्ट, करनाल -विरुद्ध- श्रीमती. प्रकाश वंती (मृत) आणि अन्य, जे. टी. (1995) 5 एस. सी. 151, संदर्भित.

दिवाणी अपील अधिकारिता : दिवाणी अपील क्रं. ५२५९/१९९६.

सी. आर. क्रं. १३०७/१९९३ मधील पंजाब आणि हरियाणा उच्च न्यायालयाचे दिनांक १४.१२.९३ रोजीचे न्यायनिर्णय व आदेश यातून उद्दवलेले.

अपीलकर्त्यांसाठी : एम. एल. वर्मा, एस. के. बग्गा, सिराज बग्गा, सुश्री एस. बग्गा आणि सुश्री मोनिका बानोत.

न्यायालयाचा पुढील आदेश देण्यात आ लाः

जरी उत्तरवादींवर बजावणी झालेली आहे, तरीहि उत्तरवादींच्या वतीने कोणीही उपस्थित होत नाही आहे.

अनुमती देण्यात आली.

हे अपील विशेष अनुमतीद्वारे दिनांक १४ डिसेंबर, १९९३ रोजी सी. आर. क्रं. १३०७/१९९३ मध्ये पंजाब आणि हरियाणा उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशातून उद्भवलेले आहे. महत्वाची तथ्ये विस्तारपूर्वक सांगण्याची गरज नाही. एवढे नमूद करणे पुरेसे आहे की या न्यायालयाने या आधीच्या प्रसंगी, 'फर' जमिनीच्या भरपाईच्या निर्धारणासाठी अगदी तेच प्रकरण परत पाठविले होते. भरपाई निर्धारण करणे प्रलंबित असताना, देय असल्याचे सांगितलेल्या विवक्षित रक्कमेच्या वसुलीसाठी उत्तरवादीने अंमलबजावणी बाबतचा अर्ज दाखल केला. उत्तरवादीला जी रक्कम देय होती त्यापेक्षा अधिक रक्कम अपीलकर्त्याने जमा केली होती असे नमूद करून अपीलकर्ता-ट्रस्टने आक्षेप दाखल केला. त्यामुळे, अंमलबजावणी बाबतचा अर्ज खारीज होण्यास पात्र आहे. आक्षेप अमान्य करण्यात आला आणि पुनरीक्षण अर्ज दाखल केल्यावर, उच्च न्यायालयाने तो कायम केला. त्यामुळे विशेष अनुमतीने अपील.

पुष्कळशे साम्य असलेल्या परिस्थितीत, जेव्हा न्यायाधिकरणाच्या प्रत्यक्ष निवाड्याबद्दलच अपीलकर्त्याने हरकत घेतली, तेव्हा या न्यायालयाने करनाल इम्प्रुव्हमेंट ट्रस्ट, करनाल -विरुद्ध- श्रीमती. प्रकाश वंती (मृत) आणि अन्य, जे. टी. (1995) 5 एस. सी. 151, या प्रकरणात निर्णय दिला होता कि इतर

सदस्यांद्वारा सहभागानसल्यामुळे न्यायाधिकरणाचे न्यायनिर्णय अवैध आणि अस्तित्वहीन आहे. तदनुसार, तो रद्द करण्यात आला. परिणामी, कायद्यानुसार जोपर्यंत नवीन निवाडा देण्यात येत नाही तोपर्यंत उत्तरवादी हुकूमनाम्याची अंमलबजावणी करू शकत नाही. उच्च न्यायालयात पुनरीक्षण अर्ज प्रलंबित असताना अपीलकर्त्याने रक्कम जमा केली होती हे सर्वमान्य आहे. निवाडा रद्द करण्यात आला होता हि वस्तुस्थिती लक्षात घेता, चुकते केलेली कोणतीही रक्कम हि अधिनियमाखाली न्यायाधिकरणाद्वारा देण्यात येणाऱ्या निवाड्याच्या निकालाच्या अधीन असेल.

अपील तदनुसार निकाली काढण्यात येते. वादखर्चाबाबत कोणताही आदेश नाही.

अपील निकाली काढले.

**अस्वीकरण**

या न्यायनिर्णयाच्या मराठी भाषेतील या अनुवादाचा वापर हा पक्षकारास त्याच्या/ तिच्या मातृभाषेमध्ये त्याचा अर्थ समजून घेण्यापुरताच मर्यादित राहील आणि त्याचा इतर कोणत्याही कारणाकरीता वापर करता येणार नाही तसेच इंग्रजी भाषेतील न्यायनिर्णय हाच सर्व व्यावहारिक आणि कार्यालयीन वापराकरिता विश्वसनीय असेल आणि तोच त्यातील आदेशाच्या निष्पादन आणि अंमलबजावणी करता वैध मानला जाईल.

.............